# श्यामचा जीवनविकास

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**श्यामचा जीवनविकास : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १४०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# दोन शब्द...

जीवनविकास अर्थात् श्याम खंड ३ रा प्रथमत: मन्वंतर मासिकातून प्रसिद्ध झाला. तो पुन्हा पुस्तकरूपाने एकत्र करीत आहे.

श्री. साने गुरुजी यांच्या लिखाणात जिवंतपणा आहे. सद्भावनांचा व उच्च विचारांचा वर्षाव आहे. ज्ञानाचा नंदादीप अखंड तेवत असावा ही त्यांची आवडती सद्भावना. या ज्ञाननंदादीपाच्या प्रशांत प्रकाशात सर्व धर्माच्या अशिक्षित सुशिक्षितांनी अज्ञानाचा नायनाट करून आपापल्या जीवनाचा विकास करून घेतला पाहिजे. त्याकरिता आनंद, सहकार्य, सेवा, बंधुभाव यांची वाढ करणारी चळवळ झाली पाहिजे. माणुसकीचा मार्ग दाखविणारी संस्कृती निर्माण झाली पाहिजे, द्वेषाचा नायनाट होऊन जातीय वाद हटले पाहिजेत व निर्मळ संघटना झाली पाहिजे. हीच त्यांची इच्छा.

पण ही संघटना होणार केव्हा? कधी तो सुदिन उगवणार? हीच विवंचना त्यांना सारखी असते. या दिव्याकरिता ते रात्रंदिवस भटकत असतात. प्रचार करीत असतात. ज्ञानाची ज्योत हाती घेऊन समतेच्या मंत्राची दीक्षा देत असतात. 'समता' हाच मंत्र जपत असतात. त्यांचे हृदय भावनाप्रधान असून आपत्तीला ठोकरणारे कठोरही आहे याचेच यथायोग्य प्रतिबिंब या पुस्तकात दिसून येईल.

आणि त्यांच्या कडक टीकेमुळे, स्पष्ट व निर्भीड मतप्रचारामुळे या पुस्तकाची प्रथमावृत्ती मुंबई सरकारने आक्षिप्त ठरविली व सर्व प्रती जप्त केल्या. ही बंदी काँग्रेस सरकारने नुकतीच उठविली. त्यामुळेच या पुस्तकाचे आम्हाला पुनर्मुद्रण करून वाचकांचे हाती देता आले.

✦✦✦

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | शाळेतील शेवटचे वर्ष | ७ |
| २. | संस्कृती म्हणजे काय? | १५ |
| ३. | मॅट्रिकची परीक्षा व मालणचे लग्न | २१ |
| ४. | दादाचा संसार सुरू झाला | २६ |
| ५. | एक अमर प्रसंग | ३५ |
| ६. | स्वयंसेवक | ४२ |
| ७. | स्वराज्याच्या मंत्राचे ऋषी | ५० |
| ८. | मानमोडी | ५६ |
| ९. | मनाची ओढाताण | ६७ |
| १०. | क्षुद्र मन | ७६ |
| ११. | सत्याग्रह | ८५ |
| १२. | दवाखान्यात | ९० |
| १३. | धाकट्या भावाचे पत्र | ९९ |
| १४. | इंग्रजीचे वेड | १०९ |
| १५. | यमुताई | ११७ |
| १६. | बालवीर चळवळ | १२६ |
| १७. | निष्ठुर श्याम | १३६ |


✦✦✦

# शाळेतील शेवटचे वर्ष

हिंदुस्थानात पुन्हा महान् सत्याग्रह संग्राम सुरू होण्याची चिन्हे दिसत होती. श्यामच्या खिन्न चेहऱ्यावर पुन्हा तेज चमकू लागले. तो आश्रमातील सवंगड्यांस म्हणाला, ‘‘आपला देश आता स्वतंत्र झाल्याखेरीज राहणार नाही. या स्वातंत्र्ययुद्धात, या अपूर्व अशा अहिंसक समरात माझा देह पडो एवढीच माझी इच्छा आहे. डोक्यावर लाठी पडो, छातीत गोळी घुसो, हा देह कृतार्थ होवो. देशासाठी मरणाचे डोहाळे मला होत आहेत.’’

‘‘श्याम, हा कदाचित् शेवटचा स्वातंत्र्यसंग्राम होईल. महात्मा गांधी मागे इंग्लंडमध्ये वाटोळ्या परिषदेचे वेळी म्हणाले होते, ‘पुन्हा केव्हातरी माझ्या आयुष्याच्या सायंसमयी महान् स्वातंत्र्यसंग्राम मी करीन. त्या वेळेस ६० हजार लोक बरोबर घेऊन नाही उभा राहणार तर ६० लाख लोक बरोबर घेऊन नि:शस्त्र संगरार्थ उभा राहीन.’’ महापुरुषाचे ते महान् शब्द खोटे कसे होतील? लाखो लोक सिद्ध आहेत. किसान, कामगार, विद्यार्थी, स्त्रीपुरुष सर्व सिद्ध आहेत. सत्याग्रहींची नोंद होत आहे. काल गोविंदा व मी नांदेडला गेलो. तेथे ५० लोकांनी नावे दिली. २० भगिनींनी दिली.

उद्या लढा प्रत्यक्ष सुरू झाला तर आणखीच जनता उचंबळेल. श्याम, तू अशक्त व आजारी. एकदा झगडा सुरू झाला म्हणजे आपण कोण कोठे जाऊ, कोणाला माहीत? आपण मग केव्हा परत भेटू ते देव जाणे. श्याम, तू रागावशील परंतु सांगतो. तुझ्या उरल्यासुरल्या काही आठवणी सांगून टाक एकदा. पुष्कळच उरले असेल ते देऊन टाक. सांग सारे भराभर. कर जीवनाचा सिंधू आमच्यासमोर रिकामा. तू म्हणशील, ही वेळ गतकाळाच्या स्मरणाची नाही. ही वेळ भारताच्या उद्धरणाची आहे. प्रत्येक क्षण आता प्रचारात गेला पाहिजे. सर्वत्र पवित्र परंतु तेजस्वी, उचंबळणारे परंतु संयमी स्वातंत्र्यप्रेमाचे वातावरण निर्मिले पाहिजे. ते आपण करूच; परंतु मिळेल थोडासा वेळ त्यात तुझे सारे सांग. श्याम, नाही म्हणू नकोस. मी हाक मारतो सर्वांना. बोलावू?'' सुभानने विचारले.

श्याम स्तब्ध होता. त्याचे लक्ष नव्हते. ''बोलवू का श्याम? आता वेळ नको. बोलत का नाहीस? रागावलास?'' त्याने पुन्हा विचारले.

''सुभान, तुझ्यावर मी कधी तरी रागावेन का? जा, सर्वांना बोलाव. माझी इच्छा मी कधीच मारली. आता तुमची इच्छा ती माझी इच्छा. तुमच्या इच्छाशक्तीने तर जगत आहे मी.'' श्याम म्हणाला.

सुभानने सर्व मित्रांना हाक मारली. इतरही काही प्रेमी मंडळी जमली. सहृदय श्रोते गोळा झाले. श्यामच्या डोळ्यांसमोर भूतकाळ गोळा होत होता. त्याने आरंभ केला.

''माझी आई गेली. तिच्या चिरवियोगाचे तीव्र दु:खही हळूहळू गेले. डोळ्यांसमोर आता मॅट्रिकची परीक्षा होती. अभ्यास केला पाहिजे होता. आई गेली तरी वडील होते. आपली मुले मोठी होतील व आपली खाली झालेली मान वर होईल या आशेवर ते जगत होते. आशा म्हणजे अमर रसायन. आशा म्हणजे निराधारांचा आधार. आशा म्हणजेच परमेश्वर. जीवनातून आशा जर अस्तंगत झाली तर जीवन भेसूर व भयाण वाटेल. आशा म्हणजे संगीत, आशा म्हणजे प्रकाश.

मी व माझा मित्र राम इंग्रजी ७ वीत होतो परंतु एका तुकडीत नव्हतो. राम हुशार मुलांच्या तुकडीत होता. त्या तुकडीला प्राध्यापक शिकवायला येत. नूतन मराठी विद्यालयाचे महाविद्यालय त्या वेळेस नुकतेच सुरू झाले होते. त्याचे त्या वेळचे नाव ''न्यू पूना कॉलेज'' असे होते. प्राध्यापक तुळपुळे, घारपुरे, फडके, करमरकर वगैरे



रामच्या वर्गाला शिकवीत. खरे म्हटले तर कमी बुद्धिमान् मुलास अधिक लायक शिक्षक हवेत. मृदू काळ्याभोर जमिनीला थोडा पाऊस पुरतो. दगडाळ भूमीला मुसळधार पावसाची जरूर असते; परंतु जगात सारे उलटे. बुद्धी बुद्धीकडे जाते, पैसा पैशाकडे जातो. अशाने जग कसे सुधारणार! प्रकाशाने अंधाराकडे जावे, बुद्धीने बुद्धिमंतांकडे जावे, धनाने दरिद्र्यांकडे जावे. मला थॉमस पेनच्या एका वाक्याची आठवण होते. थॉमस पेन हा मानवी स्वातंत्र्यासाठी झगडणारा एक वीर होता. फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. त्या वेळेस काही अत्याचार झाले. इंग्लंडमध्ये बर्क म्हणून एक महान् पंडित त्या वेळेस होता. त्याने या क्रांतीवर एक ग्रंथ लिहिला. क्रांतीला उद्देशून काही निबंध लिहिले. बर्क बहुजन समाजाला तुच्छ मानी. थॉमस् पेनने बर्कच्या ग्रंथाला उत्तर म्हणून ''मानवी हक्क'' पुस्तक लिहिले. थॉमस् पेनचे नाव त्या वेळेस युरोप-अमेरिकेत गाजले. अमेरिकेत त्याच वेळेस बेंजामिन फ्रँकलिन म्हणून एक थोर शास्त्रज्ञ व देशभक्त झाला. एकदा त्याची व थॉमस् पेनची गाठ पडली. त्या वेळेस फ्रँकलिन म्हणाला, "Where liberty is, there is my country. जेथे स्वातंत्र्य असेल, तेथे माझा देश.'' परंतु पेन म्हणाला, Where is not liberty, there mine जेथे स्वातंत्र्य नसेल तेथे माझा देश.'' थॉमस पेनच्या या उद्‌गारांत उदार भावना आहे. जेथे जेथे पद्‌दलित लोक असतील, दास्यात खितपत पडलेले लोक असतील, तेथे तेथे तो गेला असता, त्यांच्यासाठी मेला असता. जेथे दु:ख आहे, दास्य आहे, दारिद्र्य आहे, तेथे जाऊन घर करणारा, त्या सर्व अन्यायांचा परिहार करू पाहणारा असा हा थॉमस पेन होता. हे उद्‌गार आपण ध्यानी धरूया. जेथे प्रकाश आहे तेथेच प्रकाश घेऊन नका जाऊ. जेवलेल्याला जेवण देण्याने अजीर्ण मात्र व्हावयाचे.

असो. आम्हाला रामच्या वर्गाचा हेवा वाटे; परंतु हेवा करून काय मिळणार होते? त्यांना ते प्राध्यापक तुळपुळे वर्गावर येताच आधी दहा मिनिटे जगातील वार्ता सांगत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी सांगत. आज या क्षणी जग कोठे आहे ते मुलांना कळले पाहिजे. शाळांतून वार्ताफलक पाहिजेत. त्यावर प्रत्यही वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या वार्ता लिहून ठेवल्या पाहिजेत. नाहीतर शाळेत मुले शिकत असतात; परंतु ते वर्तमानकाळापासून दूर असतात. कंपनी सरकारच्या, गव्हर्नरांच्या याद्या त्यांना पाठ असतात. त्या पवित्र नावांची स्तोत्रे करून मुलांना शिकवितात. ती पवित्र नावे माझ्या ओठांवर नाचतात; परंतु माझ्या राष्ट्राला मुक्त करू पाहणाऱ्यांची नावे मला माहीत

नसतात. राष्ट्राच्या बहुविध कार्यक्षेत्रांत निरनिराळ्या प्रांतांत कितीतरी थोर पुरुष कामे करीत आहेत; परंतु विद्यार्थ्यांना ना दाद ना फिर्याद.

एकदा पुण्याच्या एका टोलेजंग हवेलीतील शाळेत जाणारा एक विद्यार्थी मला भेटला होता. तो होता इंग्रजी ७ वीत. तो मला म्हणाला, ''महात्मा गांधी हल्ली सरहद्द प्रांतातील खेड्यांतून पायी हिंडत आहेत.'' मी त्याला म्हटले, ''अरे महात्मा गांधी तर जुहूला आहेत. ते आजारी आहेत. तेथे विश्रांती घेत आहेत.'' मी त्याला पुन्हा म्हटले, ''अरे ते सरहद्द गांधी असतील. ते हल्ली हिंडत आहेत.'' तो मला म्हणाला, ''हे सरहद्द गांधी काय प्रकरण आहे?'' त्याचे ते अज्ञान पाहून मला वाईट वाटले.

किती शरमेची गोष्ट! आपल्या या मृत राष्ट्राला जीवनकळा देणारा एक महापुरुष अहोरात्र श्रमून श्रमून आजारी पडून राहिला आहे, ही वार्ता आम्हाला माहीत नाही! आणि ज्या खैबरखिंडीतून मुसलमानांच्या लाटा आल्या, त्याच बाजूला त्या धिप्पाड पठाण बंधूंत अहिंसेचे उपनिषद गाणारा, निर्मळ देशभक्तीचा समुद्र उचंबळविणारा तो महापुरुष, ते सरहद्द गांधी, ते खान अब्दुल गफारखान, तेही आम्हास माहीत नाहीत! ही नावे माहीत नाहीत मग कोणाची ठाऊक असणार? थोर राजकीय पुढाऱ्यांची नावे माहीत नाहीत, मग इतरांसंबंधी बोलणेच नको. इक्बाल माहीत नाहीत, नंदलाल माहीत नाहीत, न्हानालाल माहीत नाहीत, गिजुभाई माहीत नाहीत; भारताची भारताला ओळख नाही. आपण स्वत:ला पारखे झालो आहोत. जो स्वत:ला पारखा झाला त्याला सारे पारखे होतात. त्याला वैभव, स्वातंत्र्य सारे पारखे होते.

परंतु काळ बदलत आहे. आज विद्यार्थ्यांत अजूनही स्वदेशाचे पूर्णपणे भान नसले तरी ते भान येत आहे. मी शिकत होतो तेव्हा तर फारच अज्ञान होते. आजच्यासारखेच महायुद्ध त्या वेळेस चालले होते. आमच्या वर्गातून युद्धाला मदत गोळा करण्यात आली. सर्व हिंदुस्थानभर शाळाशाळांतून वर्गणी गोळा करण्यात आली. काही शाळांतील विद्यार्थ्यांनी नाटके केली व त्यांचे उत्पन्न त्या युद्धाला दिले गेले. या भिकारी श्यामलाही दोन आणे द्यावे लागले. परंतु आजच्या महायुद्धाला कोणता विद्यार्थी मुकाट्याने मदत देईल? आज विद्यार्थ्यांच्या संघटना आहेत. विद्यार्थी संघ आहेत. त्यांची अभ्यास मंडळे आहेत. साम्राज्यवाद काय, साम्यवाद काय त्यांना कळू लागले आहे.

विद्यार्थी हा आधी मनुष्य आहे व मग विद्यार्थी आहे. आज मी विद्यार्थी आहे, मी मुकाट्याने शिकावे, संप पुकारू नये, विरोध दाखवू नये असे कोणी म्हणेल तर ते



हास्यास्पद आहे. मी विद्यार्थी असलो म्हणून काय झाले? मी का मानवधर्माला काडी लावावी? शाळांतून स्वातंत्र्याचे लढे शिकविले जातात, धडे पढविले जातात; परंतु आजच्या स्वातंत्र्याच्या लढ्यापासून त्याला सदैव दूर राखू पाहतात. असले संस्कारहीन शिक्षण काय किमतीचे? अमेरिकेतील निसर्गप्रेमी व स्वातंत्र्यप्रेमी थोरो एके ठिकाणी लिहितो, ''मुलगा अर्थशास्त्र शिकत असतो व घरी बाप कर्जबाजारी होत असतो.'' शिक्षणावर ही टीका आहे, यथार्थ टीका आहे. जीवनाशी फारकत करणारे शिक्षण फेकून दिले पाहिजे. एकदा आचार्य पूज्य विनोबाजी आपला एक अनुभव सांगताना म्हणाले, ''आम्ही बडोद्याला शाळेत शिकत होतो. शिवजयंतीचा दिवस आला. आम्ही सर्वांनी लांब जंगलात डोंगराच्या पायथ्याशी कोठेतरी शिवजयंती साजरी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही केले. शाळेला बुट्टी दिले. दुसरे दिवशी शिक्षकांनी विचारले, ''काल कोठे होता?'' मुलांनी उत्तर दिले, ''शिवजयंती साजरी करण्यासाठी गेलो होतो.'' शिक्षक म्हणाले, ''शाळेतच एक तास सुट्टी देऊन साजरी करता आली असती.'' मुले म्हणाली, ''बंधनाच्या दिवाणखान्यात शिवजयंती साजरी होत नसते. रानात, मोकळ्या आकाशाखाली, पहाडाच्या मुक्या अध्यक्षतेखाली शिवाजीमहाराजांची जयंती साजरी करण्यात अर्थ आहे.'' मुलांना दंड झाला. त्यांनी खिशात पैसे आणलेच होते. ते भराभर टेबलाकडे फेकले. त्या मुलांना शिवजयंती समजली. ते खरे शिक्षण होते. त्याचा जीवनावर परिणाम करणारा संस्कार होत होता; परंतु आम्ही नूतन मराठीतील त्या वेळची मुले. आम्ही त्या युद्धाला वर्गण्या दिल्या. कोणीही विरोध केला नाही.

आमच्या तुकडीला प्राध्यापक शिकवायला नसले तरी चांगले शिक्षक होते. आम्हाला श्री. लक्ष्मणशास्त्री लेले संस्कृत शिकवीत. फारच सुंदर शिकवीत. शाकुंतलातील एखाद्या श्लोकातच सारा तास जाई. अभिनय करून ते शिकवीत. लेलेशास्त्री रसिक होते. कधी कधी ते फार संतापत. उच्चार चुकलेला त्यांना सहन होत नसे. एकदा संस्कृत संख्यावाचके ते शिकवीत होते. एका मुलाने 'पंच' असे म्हटले. त्याबरोबर ते रागावले. ''पंच पंच काय म्हणता? पञ्च म्हणा. नाहीतर दुसरीत जाऊन बसा.'' स्वच्छतेचे व व्यवस्थेचे ते फार भोक्ते. शिस्त म्हणजे त्यांचा प्राण. वर्गात एकदा संस्कृत बाजूला राहिले व शिस्तीवरच प्रवचन ऐकावे लागले. कधी कधी वर्गात मौज होई. एकदा लेलेशास्त्री रागावूनच वर्गावर आले होते.

''मॉनिटर, अभ्यास काय आहे दिलेला?'' त्यांनी एकदम विचारले.